## 12. उपराष्ट्रपती
## भाग V कलम 63 ते 71

- स्वीकार - अमेरिकेच्या राज्यघटनेतून.
- राष्ट्रपतीनंतर दुसऱ्या क्रमांकाचे पद आहे.
- **कलम 63 -** मध्ये उपराष्ट्रपती पदाची तरतुद
- भारताचे उपराष्ट्रपती पद हे अमेरिकन उपराष्ट्रपती पदावर आधारलेले आहे.
- (अमेरिकेप्रमाणे भारताचे उपराष्ट्रपती हे वरिष्ठ सभागृहाचे पदसिध्द अध्यक्ष म्हणून कार्य करतात.)
- **कलम 64 -** उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा अध्यक्ष असेल पण सदस्य नसेल.
- **कलम 65 -** उपराष्ट्रपतींच्या कार्याची तरतुद.
- **कलम 66 -** मध्ये उपराष्ट्रपतीची निवडणूक राष्ट्रपती सारखी एका निर्वाचकगणाकडून अप्रत्यक्षपणे, एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर पध्दतीद्वारे व गुप्त मतदान पध्दतीनेच होते.
- **कलम 66(1) -** उपराष्ट्रपतीची निवड लोकसभा व राज्यसभा या दोन्हीही सभागृहाचे निर्वाचित व नामनिर्देशित सदस्य (संसदेचे सदस्य) करतात.
- **कलम 66(2) -** उपराष्ट्रपती संसद किंवा राज्यविधीमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसेल आणि असेल तर राजीनामा देईल.
- **कलम 66 (3-4) -** पात्रता - 35 वर्षे पूर्ण असावीत. राज्यसभेच्या सदस्यत्वास पात्र. भारतीय नागरिक असावा.
- **कलम 67 -** कार्यकाल - 5 वर्षे किंवा तत्पुर्वी राष्ट्रपतींकडे राजीनामा देईल किंवा राज्यसभेत प्रभावी बहुमताने व लोकसभेत साध्या बहुमताने ठराव मंजूर करुन पदावरुन दूर करता येईल.
- उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक अर्ज करतांना उमेदवाराच्या आवेदनपत्रास 20 मतदात्यांनी पाठिंबा तर किमान 20 मतदानासाठी अनुमोदन देणे गरजेचे.
- **कलम 68(1) -** उपराष्ट्रपतीचा पदावली संपण्यापूर्वीच नवीन उपराष्ट्रपतीची निवड करण्यात येईल.
- **कलम 68(2) -** उपराष्ट्रपती पद मृत्यू, राजीनामा, पदावरुन दूर करण्याच्या कारणामुळे रिक्त झाल्या 6 महिन्याच्या आत उपराष्ट्रपती पद भरण्यात येईल.
- **कलम 69 -** उपराष्ट्रपतीला पद आणि गोपनियतेची शपथ राष्ट्रपती देतील.
- **कलम 70 -** राष्ट्रपती व उपराष्ट्रपती दोन्हीही पदे रिक्त असल्यास हंगामी राष्ट्रपती म्हणुन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश किंवा ज्येष्ठ न्यायाधीश कार्य करतात.
- **कलम 71 -** मध्ये उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीतून उद्भवणाऱ्या विवादाबद्दल तरतुदी आहेत.
- चौकशी व निर्णय सर्वोच्च न्यायालय कडून करण्यात येईल व निर्णय त्यांचा अंतिम असेल.
- उपराष्ट्रपतीची निवडणूक सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल म्हणून घोषित केल तर त्याची कृती ग्राह्य नसते.
- **कलम 89 -** उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

**उपराष्ट्रपतीचे पद रिक्त असल्यास यांचे काम राष्ट्रपती म्हणून असते.**

- सामान्यत: उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिध्द सभापती म्हणून कार्य करतात.
- अमेरिकन उपराष्ट्रपती सुध्दा सिनेटचे पदसिध्द अध्यक्ष म्हणून कार्य करतात.
- उपराष्ट्रपती राष्ट्रपतीची जागा रिक्त असल्यास ते राष्ट्रपती म्हणून जास्तीत जास्त 6 महिने काम करतात.
- राष्ट्रपती आजारी, अनुपस्थित असल्यास उपराष्ट्रपती राष्ट्रपती म्हणून काम करतात. (या कालावधीत ते राज्यसभेचे सभापती म्हणून कार्य करतात.)



- अमेरिकेत उपराष्ट्रपती त्याचा उर्वरित पदावधीसाठी राष्ट्रपतीची जागा रिक्त असेल तर कार्य करतात.
- भारतात मात्र राष्ट्रपती पद ग्रहण करेपर्यंत उपराष्ट्रपती हंगामी राष्ट्रपती म्हणून कार्य करतात. (जास्तीत जास्त 6 महिने.)
- राष्ट्रपतींचा उल्लेख His Spuerflous Highness असा काही तज्ञ करतात.
- **हंगामी राष्ट्रपती झालेले उपराष्ट्रपती -**
  1. व्ही. व्ही. गिरी
  2. बी. डी. जत्ती
- **बिनविरोध निवडून आलेले उपराष्ट्रपती -**
  1. डॉ. राधाकृष्णन
  2. शंकर दयाळ शर्मा
  3. महम्मद हियादतुल्ला
- **दोन वेळेस उपराष्ट्रपती -**
  1. डॉ. राधाकृष्णन (1952-57, 1957-62)
  2. डॉ. हमीद अन्सारी (2007-12, 2012-17)
- **सर्वात कमी काळ उपराष्ट्रपती -** व्ही. व्ही गिरी (1967-69)
- **पदावर असताना मृत्यू पावलेले उपराष्ट्रपती -** के. कृष्णकांत
- मोप्पावरपू व्यंकय्या नायडू हे देशाचे व्यक्ती म्हणून 13 वे तर पद म्हणून 15 वे उपराष्ट्रपती 11 ऑगस्ट, 2017 पासुन आहेत.

## स्वतंत्र भारताचे आतापर्यंतचे उपराष्ट्रपती – १९५२ ते २०२३

| निवडणुक वर्षे | विजयी उमेदवार (उपराष्ट्रपती) | प्राप्त मते | प्रमुख प्रतिस्पर्धी | प्राप्त मते % |
|---|---|---|---|---|
| 1952 | डॉ.एस.राधाकृष्णन | - | बिनविरोध | - |
| 1957 | डॉ.एस.राधाकृष्णन | - | बिनविरोध | - |
| 1962 | डॉ.झाँकीर हुसेन | 568 | एन. सामंत सिंह | 14 |
| 1967 | व्ही.व्ही.गिरी | 468 | प्रो. हबीब | 192 |
| 1969 | जी.एस.पाठकक | 400 | एच.व्ही.कामथ | 156 |
| 1974 | बी. डी. जत्ती | 521 | एन. ई. व्होरो | 141 |
| 1979 | एम. हिदायतुल्ला | - | बिनविरोध | - |
| 1984 | आर.वेंकटरमण | 508 | बी.सी.कांबळे | 207 |
| 1987 | डॉ.शंकर दयाल शर्मा | - | बिनविरोध | - |
| 1992 | के.आर.नारायणन् | 700 | काका जोगिंदरसिंह | 1 |
| 1997 | के.कृष्णकांत | 441 | सुरजीतसिंह बर्नाला | 273 |
| 2002 | भैरवसिंह शेखावत | 454 | सुशीलकुमार शिंदे | 305 |
| 2007 | मोहम्मद हमीद अन्सारी | 425 | नजमा हेप्तुल्ला | 222 |
| 2012 | मोहम्मद हमीद अन्सारी | 490 | जयवंत सिंह | 238 |
| 2017 | मोप्पावरपू व्यंकय्या नायडू | 516 | गोपाळकृष्ण गांधी | 244 |
| 2022 | जगदिप धनखड | ... | मार्गारेट अल्वा | ... |

31/71